
# दुष्काळात पावसाचा थेंब: गोदावरी डांगे




लेखन: रीतिका रेवती सुब्रमणियन
चित्रे: मैत्री डोरे

प्रतिलेखन: अनुपमा जोशी

© Copyright, 2021 सर्व हक्क रीतिका रेवती सुब्रमणियन आणि मैत्री डोरे यांच्या स्वाधीन. या पुस्तकातील कोणताही मजकूर किंवा चित्रे पुनर्मुद्रित करण्यापूर्वी रीतिका रेवती सुब्रमणियन, मैत्री डोरे आणि Goethe-Institut Indonesien यांची परवानगी घेणे आवश्यक आहे.

'दुष्काळात पावसाचा थेंब: गोदावरी डांगे' हे चित्रमय पुस्तक रीतिका रेवती सुब्रमणियन आणि मैत्री डोरे यांनी Goethe-Institut Indonesien च्या *Movements and Moments – Feminist Generations* या उपक्रमादरम्यान तयार केले. या उपक्रमाचे उद्दिष्ट विकसनशील देशांमधील स्त्रीवादी कार्यकर्त्यांच्या कामाची माहिती पुढे यावी हा आहे. विविध देशांतल्या स्त्रियांच्या गोष्टी सर्वदूर सहज पोहोचाव्यात म्हणून चित्रमय पुस्तके (कॉमिक्स) या उपक्रमांतर्गत बनवली आहेत.

GOETHE
INSTITUT


## ऋणनिर्देश

या पुस्तकाच्या कामासाठी गोदावरी डांगे यांनी आमच्यावर पूर्ण विश्वास ठेवून त्यांचा आजवरचा प्रवास आम्हाला मोकळेपणाने सांगितला, याबद्दल आम्ही त्यांच्या ऋणी आहोत. गोदावरीताईंचे कुटुंबीय, मित्र-मैत्रिणी आणि स्वयम् शिक्षण प्रयोग (उस्मानाबाद) या संस्थेतील त्यांचे सहकारी या सर्वांनी आम्हाला खूप मदत केली, वेळ दिला आणि वेळोवेळी पाहुणचारही केला, त्याबद्दल त्यांचेही मनापासून आभार.

एखादी गोष्ट चित्रांमधून सांगणे सोपे नसते. त्या कामासाठी नाचा फोलनवायडर आणि Goethe-Institut Indonesien ची टीम यांनी खूप चांगले मार्गदर्शन केले. त्यामुळेच गोदावरीताईंची ही गोष्ट आम्ही चित्रांतून मांडू शकलो.


हे पुस्तक आम्ही मराठवाड्यातील सर्व महिला शेतकऱ्यांना अर्पण करतो आहोत.

# प्रकरण १ : सुरुवात


माझा जन्म १९७७ साली मराठवाड्यातल्या तुळजापूर तालुक्यात गंधोरा गावी झाला.
अहो दादा, मुलगी झाली.
माझे वडील, भीमाशंकर डांगे, हे गावातल्या शाळेत शिक्षक होते. आमची जात गुरव. मी जन्मले तेव्हा बाबांना आनंद झालाच होता, पण काळजीही वाटत होती.


१९६० च्या दशकाच्या उत्तरार्धात भारत सरकारने शेतीच्या नवीन पद्धती अमलात आणल्या होत्या. त्यामुळे कोरड्या जमिनींचं रूप बदलून हिरवीगार भातशेती किंवा गव्हाची शेती दिसू लागली होती.


पंजाब, हरयाणा आणि उत्तर प्रदेशातले शेतकरी हरितक्रांतीचं यश अनुभवत होते.




पण आमच्या मराठवाड्यात आम्ही १९७२ च्या भयंकर दुष्काळाचे परिणाम भोगत होतो.

गोदावरी नदी ही लांबीने भारतातली दुसऱ्या क्रमांकाची नदी. जीवन देणारी आणि पोषण करणारी, म्हणून 'गोदामाई' या नावाने तिची पूजा होते. पण नेहमी येणाऱ्या दुष्काळामुळे ही नदी कोरडी पडली होती.


मराठवाड्याच्या जनतेला इतका भयंकर दुष्काळ जवळपास अर्ध्या शतकानंतर सहन करावा लागत होता.


आई मला सांगायची, त्यावेळी गवत-दाणा-पाणी काही न मिळाल्यामुळे शेकडो जनावरं मेली होती.








घरकामात मदत करण्यासाठी अनेक मुलींना शाळा सोडून द्यावी लागली.

शेतं उजाड झाली होती आणि उत्पन्नाचं दुसरं काही साधन नव्हतं म्हणून कुटुंबातल्या पुरुषांनी नोकरीच्या शोधात शहरांकडे स्थलांतर केलं.




माझा जन्म झाला तेव्हा आमच्याकडे शेतजमीन नव्हती. पण बाबा गंधोऱ्यातच राहिले, आणि गावच्या आटत चाललेल्या नदीचं पुनरुज्जीवन करण्यासाठी प्रयत्न करत राहिले.




मला शाळा खूप आवडायची. इतिहास माझा सगळ्यात आवडता विषय होता.


गंधोरा गावात मुलींना एकटीने घराबाहेर पाठवत नसत. माझी आई कधीच शाळेत गेली नव्हती. पण आपल्या मुलींनी शिकावं, अभ्यास करावा यासाठी ती नेहमी प्रोत्साहन द्यायची. माझा भाऊ सुनील, माझ्या बहिणी आणि मी – आम्हाला सर्वांना ती समान वागणूक द्यायची.
आकू, अभ्यास राहू दे आता. भाकरी खाऊन घे.



शाळा सुटली की मी आणि अर्चना गावभर फिरायचो. ती माझी एकदम खास मैत्रीण होती.
चल, सगळ्यात उंच फांदीवर चढू या.
कधी कधी तिची मनधरणी करावी लागायची...
....पण माझं धाडस आणि उत्साह पाहून तीही साथ द्यायची. आमची जोडी छान जमली होती।
आता थोडंच राहिलं!
आज ती तुळजापूरमधली पहिली महिला पोस्टमास्तर आहे.
आम्ही झाडाच्या शेंड्यावरून दूरवरची शेतं पाहत राहायचो.




बहुतेक गरजू, अतीगरीब, अल्पभूधारक शेतकरी वंचित जातीचे असायचे. त्यांच्या जमिनी छोट्या आकाराच्या आणि कोरड्या असायच्या. पाऊस पडला नाही की पीक नाही, मग कर्ज घ्यायचं, हलाखीत जगायचं – या चक्रात हे शेतकरी अडकलेले असायचे. स्वतःकडची सगळी बचत ते बोअरवेल खोदण्यासाठी खर्च करायचे.





आकू, तिथे वर काय करतेयस? खाली ये, आईला मदत कर!
सुनील नेहमी आमच्या उत्साहावर पाणी टाकायचा.


त्या वर्षीसुद्धा पाऊस पडलाच नाही. पाणी भरण्यासाठी आम्हाला दोन किलोमीटर चालत जावं लागायचं.
लवकरच आमच्याकडचे पैसे संपत आले.


आई, तुझा आवडता हार तू का विकतेयस?
आपल्याला खायला काहीच नाही.
माझ्या बहिणीच्या लग्नात हुंडा देण्यासाठी घेतलेलं कर्ज वाढतच राहिलं.


त्यातच मला माध्यमिक शाळेत प्रवेश मिळाला. ती शाळा दुसऱ्या गावाला होती. तिथे जायला बसही नव्हती.
तिला इतक्या लांब शाळेत कसं पाठवणार?
शाळेतून काढू या तिला.


# प्रकरण ३ : शाळेत पुन्हा प्रवेश




मला शाळेत जाऊन शिकण्याची खूप इच्छा होती, पण घरकामातून वेळच मिळायचा नाही.




अनिता कुलकर्णी आमच्या शेजारी राहायच्या. त्या ब्राह्मण होत्या. त्यांच्या जातीत बायकांना घराबाहेर जाऊन काम करण्याची परवानगी नव्हती. पण त्या खूप स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाच्या होत्या. त्या ट्रॅक्टर चालवायच्या, शेत नांगरायच्या आणि शेतीची सगळी कामं करायच्या.





कुलकर्णीताई सेंद्रिय शेती करायच्या. गावातले सगळे मोठे शेतकरी सोयाबीन आणि ऊस अशी नगदी पिकं घ्यायचे आणि विकून नफा कमवायचे. कुलकर्णीताईंनी मला कडधान्य, ज्वारी-बाजरी, पालेभाज्या असं पिकवायला शिकवलं. त्या कधीच जंतुनाशक आणि रासायनिक खतं वापरायच्या नाहीत.



त्यांच्यासोबत मी शेतावर तासनतास काम करायची आणि सगळं शिकून घ्यायची – नांगरणी, पेरणी, कापणी.





त्या मला दिवसाला पाच रुपये द्यायच्या. मी अन्न पिकवण्याची संपूर्ण प्रक्रिया त्यांच्याकडून शिकले. किती मजा यायची तेव्हा!




शेतातली कामं खूप कठीणही होती.
कुलकर्णीताई आणि गावातल्या इतर
बायका शेतात अनेक तास राबायच्या.






# प्रकरण ४ : माझं नवीन कुटुंब






माझ्या नव्या घरातलं आयुष्य खूपच वेगळं होतं. ते एक मोठं एकत्र कुटुंब होतं. माझा दिवस सकाळी खूप लवकर सुरू व्हायचा आणि रात्री उशिरा संपायचा. गंधोऱ्याला असताना आई आम्हाला सगळ्यांना एकत्र जेवायला बसवायची. पण या घरात पुरुष आणि मुलगे आधी जेवायचे.




आणि घरातल्या बायका उरलेल्या अन्नावर भागवायच्या. बऱ्याच वेळा अर्धपोटी झोपायला लागायचं.





पण माझे पती खूप चांगले आणि प्रेमळ होते.
ही भाकरी खाऊन घे.
आमच्या चार वर्षांच्या सहजीवनात आम्ही आमचं एक सुंदर जग निर्माण केलं होतं. आम्हाला दोन मुलगे झाले, शुभम आणि सुशांत.
पण अचानक माझ्या आयुष्याची सुरळीत चाललेली गाडी कचकन थांबली. १९९८ साली श्रीधर यांचा अपघाती मृत्यू झाला.
आई, बाबा कुठेय?

# प्रकरण ५ : पुन्हा सुरुवात




मी माझ्या माहेरी गंधोऱ्याला परत आले.




पुढचं अख्खं वर्ष सगळं धूसरच होतं. मी २१ वर्षांची होते, दोन मुलांची आई आणि एक तरुण विधवा.




मला एकदम धक्का बसला – माझ्या मुलांसाठी चॉकलेट घ्यायलाही माझ्याकडे पैसे नव्हते. त्यांच्या भविष्याचं काय?
मी माझं आयुष्य पुन्हा जगायला लागले, माझ्या मुलांसाठी, माझ्या मुलांच्या सोबतीने.

माझी आई गंधोरा गावातल्या बचत गटाची सदस्य होती. १९९३ साली जो मोठा भूकंप झाला, त्यानंतर हा बचत गट स्थापन झाला. भूकंपात मराठवाड्यातली जवळपास १०,००० माणसं मेली आणि हजारो लोकांची घरं आणि उत्पन्नाची साधनं गेली. पुढे आलेल्या दुष्काळात महिलांचे खूप हाल झाले. एक दिवस नसीमताईंनी आमच्या गावात मीटिंग घेतली.







थोडीफार शाळा शिकले त्याचा उपयोग झाला. पण गणित कठीण जायचं.






हळूहळू बेरीज-वजाबाकी जमू लागली. इतर बायकांशी बोलताना, त्यांचे अनुभव ऐकताना मला माझं आयुष्य नव्याने घडवण्यासाठी कारण सापडलं.

२००७ साली मराठवाड्यात पुन्हा दुष्काळ पडला. शेतीसाठी अगदी कमी पाणी उपलब्ध होतं. श्रीमंत शेतकरी त्यांची नगदी पिकं जगवण्यासाठी अगदी खोलपर्यंत बोअरवेल खणू लागले. येत्या वर्षात अनिश्चितता, नुकसान आणि भूक यांचा सामना करावा लागणार हे गरीब महिलांना स्पष्ट दिसत होतं.



अन्नधान्य पिकवायला महिलांना तयार करणं हे माझ्यासाठी कठीण काम होतं. त्यांचे नवरे त्यांना जमिनीचा अर्धा एकर तुकडाही त्यासाठी द्यायला तयार नव्हते. मला फक्त एकच व्यक्ती माहीत होती जी माझ्यावर पूर्ण विश्वास ठेवेल – माझी मैत्रीण अर्चना.





अर्चनाने तिच्या जमिनीत मिश्र पिकं घ्यायला सुरुवात केली – ज्वारी-बाजरी, कडधान्य आणि पालेभाज्या. थोड्या पाण्यावरच ती पिकं चांगली तयार झाली.

ही गोष्ट जसजशी पसरली, तसतशा इतर महिला त्यांच्या छोट्या जमिनीच्या तुकड्यांवर ही पिकं घ्यायला पुढे येऊ लागल्या.





उस्मानाबादच्या कृषी विज्ञान केंद्रातल्या वैज्ञानिकांना आम्ही वेळोवेळी बोलवायचो. कमी पाणी वापरून शेतीतून चांगलं उत्पन्न कसं मिळवायचं त्याच्या पद्धती त्यांनी सांगितल्या. त्यांच्या सल्ल्याने आमचे शेतकरी त्यांच्या जमिनीच्या तुकड्यांत ठिबक सिंचन, पाणी शिंपडणारे फवारे वगैरे वापरू लागले.




आमच्या शेतकरी महिलांना आता दुष्काळाची भीती वाटेनाशी झाली. प्रयोगशाळेतून आमचं मॉडेल प्रत्यक्ष जमिनीवर आल्यावर किती यशस्वी झालं ते सर्वांच्या डोळ्यांसमोर होतं.




अशा प्रकारे अनेक वर्ष काम केल्यानंतर स्थानिक हवामानाचे पॅटर्न आणि महिलांवर असणारे सामाजिक दबाव यांचा विचार करून आम्ही 'वन एकर मॉडेल' बनवलं. त्यामध्ये ३६ प्रकारची कोरडवाहू आणि अल्प काळात तयार होणारी पिकं अर्ध्या ते एक एकर जमिनीवर घेतली जायची – पालेभाज्या, ज्वारी-बाजरी, कडधान्य वगैरे. ऋतुमानानुसार आम्ही वेगवेगळी बियाणी वापरायचो. आमचं उद्दिष्ट एकच होतं – सर्वांना वर्षभर खायला मिळालं पाहिजे.


पण सगळ्या महिलांना हे करणं सोपं नव्हतं. गावातले 'उच्च' जातीचे प्रमुख पुरुष, फारशी मदत न करणारे सरकारी अधिकारी आणि घरात मारझोड करणारे नवरे या सर्वांना तोंड द्यावंच लागत होतं.
हं! आता त्या बाया स्वतःला 'शेतकरी' म्हणवून घेतायत.

# प्रकरण ७ : आणि नदी वाहती झाली

'वन एकर मॉडेल'ची खरी परीक्षा झाली ती २०१२ च्या दुष्काळात. मराठवाड्यात ४० वर्षांत झाला नव्हता असा दुष्काळ त्या वर्षी पडला. शेतीसाठी सोडाच, प्यायलाही पाण्याचा थेंब नव्हता. सरकारने पाठवलेले टँकर आणि खासगी पाणी विकणारे यांच्यावर आमची भिस्त होती. येणारा प्रत्येक दिवस एक आव्हानच होता.





मला खूप आनंद याचा झाला, की आमच्या अनेक महिला शेतकरी आता स्थानिक पातळीवर नेत्या बनू लागल्या. त्यांनी इतर शेतकऱ्यांना आमचं 'वन एकर मॉडेल' स्वीकारून शेती करायला प्रवृत्त केलं. पुरुषांनाही अन्नधान्य पिकवण्याचं महत्त्व पटलं आणि ते आम्हाला पाठिंबा देऊ लागले. आम्ही या महिलांना सरकारी योजना आणि सबसिडीचा लाभ मिळवून दिला, आणि स्थानिक बाजारात विक्री करण्यासाठी मदत केली. यामुळे महिलांची मिळकत आणि बचत वाढू लागली.




२००७ मध्ये सात शेतकऱ्यांनी सुरू केलेलं हे मॉडेल आता ६०,००० महिला शेतकऱ्यांनी स्वीकारलं आहे आणि त्यानुसार त्या शेती करत आहेत.

स्थानिक पातळीवर मिळालेलं हे यश या क्षेत्रातल्या संस्था आणि जगभरात काम करणारे कार्यकर्ते यांना सांगण्याची मला संधी मिळाली. इतर देशांमध्ये लोक 'क्लायमेट चेंज' म्हणजे हवामान बदलाचा सामना कसा करत आहेत ते त्यांच्याकडून शिकायला मिळालं.




गेल्या दहा वर्षांत मी १७ देशांत फिरले. मी विमानातून प्रवास करताना खाली पाहत राहते - गंधोरा गावातल्या महिला शेतकऱ्यांनी कष्टाने आणि हिमतीने पिकवलेली हिरवीगार शेतं दिसतायत का, म्हणून!
अमेरिका सोडा हो, मी दिल्लीला सुद्धा गेलेली नाही.
मी गंधोरा गावातून कधी बाहेरच पडली नाही.
आम्हाला तिचा खूप अभिमान वाटतो.

COVID-19 ची साथ सुरू झाली, तेव्हा बाजार बंद केले गेले आणि राज्यांच्या सीमाही बंद करण्यात आल्या. भूक आणि अनिश्चितता पुन्हा एकदा वाढू लागली. नगदी पिकं घेणाऱ्या मोठ्या शेतकऱ्यांना पुन्हा नुकसान सहन करावं लागलं – त्यांचा माल विकायला बाजारपेठच नव्हती.




आमच्या महिला शेतकऱ्यांची उमेद मात्र कायम होती. त्यांच्या एक एकर जमिनीत त्यांनी पिकवलेलं धान्य आणि भाजीपाला त्यांच्या कुटुंबाचं पोषण करायला पुरेसा होता. काही महिलांनी त्यांच्या शेतातला जास्तीचा माल स्थानिक बाजारात विकून पैसेही कमावले. विजयालक्ष्मी सखी प्रोडुसर कंपनीच्या भागधारक असलेल्या या महिलांनी त्यांच्या मालाला योग्य भाव मिळवण्यासाठी बाजारातल्या पुरुषप्रधान वातावरणात हुज्जतही घातली.

आम्ही या प्रवासात खूप पुढे आलो आहोत, पण अजून बरीच लढाई बाकी आहे. 'वन एकर मॉडेल' गावागावात पोहोचायला हवं. प्रत्येक घरातल्या बायकांना उत्पादक आणि जमिनीच्या मालक म्हणून ओळखलं जायला हवं. एकत्रित काम केलं तर हे नक्की शक्य होईल.



माझं नाव गोदावरी आहे. आणि नदीसारखी मी पुढे वाहतच राहणार आहे.



रीतिका रेवती सुब्रमणियन

ही पत्रकार आणि संशोधक आहे. मूळची मुंबईची असलेली रीतिका सध्या केम्ब्रिज युनिव्हर्सिटीमध्ये 'गेट्स केम्ब्रिज स्कॉलर' म्हणून जेन्डर स्टडीज या विषयात पीएच डी करते आहे. भारतातील हवामान बदल, मजुरांचे स्थलांतर आणि लिंगभेदाशी संबंधित हिंसा अशा विषयांवर संशोधन करण्यात तिला विशेष रस आहे.



मैत्री डोरे

ही मुंबई-स्थित आर्किटेक्ट आणि मुक्त-चित्रकार आहे. तिच्या चित्रांतून तिला वंचित जनसमूहांच्या जीवनाचा संघर्ष व्यक्त करायचा आहे. विशेषतः लिंगभेद, जात आणि धर्म यांमुळे लोकांवर होणाऱ्या परिणामांवर तिला लक्ष केंद्रित करायचे आहे. सध्या ती स्वीडनमधील गॉथनबर्ग युनिव्हर्सिटीमध्ये सांस्कृतिक वारशांचे जतन या विषयात पीएच डी करते आहे.